# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## PERIODIC TEST-01(2026-27)
### MARATHI [SET-1]

Class : X  Duration : **1** Hrs
Date : 11.06.2026  Max. Marks : **25**
Admission No.:  Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्रश्न 1 :– (आकलन ) अपठित गद्यांश :–** **(5X1=5)**

कुठलाही ऋतू हा निसर्गाचा सोहळाच असतो.खेडयांमध्ये लहान गावांमध्ये ऋतूपालट लगेच कळतो.आमच्या लहानपणी ऋतूंची छान सरमिसळ असायची,इंद्रधनुष्याचे रंग जसे एकमेकांत मिसळलेले असतात तशी पाऊस संपला की त्यातला हुरहुरता ओलावा घेऊन शरदाचे चांदणे फुलायचे दवात भिजलेली पहाट पांघरूनच दिवाळी सरायची.त्या दवबिंदूची शिरशिरी हवीहवीशी वाटत असतानाच थंडीचा काटा बोचायला लागला की,कळायचे हेमंत वारे वाहू लागले.थंडीचा हा गारठून टाकणारा अनुभव माघापर्यंत पुरवायचा आणि शिशिराने गिरकी घेतली की वसंताची कळी खुलायची फाल्गुनी हवेत रंगांची उधळण व्हायची.खरंतर संक्रातीपासून एक गंध भुरळ घालायचा.तो म्हणजे आम्रमोहराचा गंध!मोहराने डवरलेली आंब्याची झाडं आणि त्यावर चालणारे कोकिळकुंजन ही देखील ऋतुबदलाचीच नांदीच!धगधगत्या ग्रीष्माआधीचा हा वसंत मला सर्वाधिक आवडतो.वसंत म्हणजे गंधवतीच्या सर्जनावा बहर.गंधवती म्हणजे पृथ्वी,आपली काळी आई आणि सर्जन म्हणजे निर्मिती.भरभरून देणे हा काळया मातीचा गुणधर्म आहे.शेतातील त-हेत-हेची पिकं असोत की,वेगवेगळया चवीची मोसमी फळं,फुलांचे गंधमधुर ताटवे असोत की,रूचिरभिन्न मसाल्याच्या वनस्पती, एकाच काळया मातीतून निसर्ग ही किमया घडवत असतो.सुगीचे दिवस आणि फाल्गुनातील उल्हास यामुळे या दिवसात मन वाऱ्यावर लहरत असतं––पतंगासारखं!

**(अ) दिलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडाः–**

1 फाल्गुनी हवेत कशाची उधळण व्हायची ?

**अ** गंधाची  **ब** रंगांची
**क** फुलांची  **ड** विचारांची

2 शिशिराने गिरकी घेतली की कोणाची कळी फुलायची?

**अ** वैशाखाची  **ब** ग्रीष्माची
**क** वसंताची  **ड** हेमंतीची

3 काळया मातीचा गुणधर्म कोणता ?

**अ** भरभरून देणे  **ब** भरभरून घेणे
**क** पीक न देणे  **ड** पाणी देणे

**(आ) उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहाः–**

1 गंधवती म्हणजे काय ?

2 सर्जन या शब्दाचा अर्थ काय?

## विभाग– ब ( व्याकरण )

**प्रश्न 2 खालील वाक्यांचे प्रकार ओळखा –** **(3X1=3)**

1 नेहमी नम्रपणे वागा.

2 अहाहा! किती सुंदर हे फूल.

3 तुम्ही वेळेचा अपव्यय का करता ?

**प्रश्न 3 काळ ओळखा :–** **(2X1=2)**

1 पावसात खेळताना मजा येणार.

2 संगीता पत्र लिहित आहे.

**प्रश्न 4 खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करुन पुन्हा लिहाः–** **(2X1=2)**

( रममाण होणे,मळमळ व्यक्त करणे,झोकून देणे )

1 सामाजिक कार्यामध्ये सर्वांनी सहभागी झाले पाहिजे.

2 सहलीचा बेत रद्द होताच सर्व विदयार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली.

**प्रश्न 5 लिंग बदला :–** **(2X1=2)**

1 वाघ

2 बोका

## विभाग (क) पाठ्पुस्तकावर आधारित

**प्रश्न 6:– खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही दोन )** **(2X3=6)**

1 दोरीवरच्या उडया मारण्याच्या प्रसंगातील तुम्हाला समजलेला विनोद स्पष्ट करा?

2 दुसऱ्या अनुभवातून काकोडकर काय शिकले?

3 दुयऱ्या दिवशी पंतांचा व्रतभंग कसा झाला?

## विभाग ड ( लेखन )

प्र 7 खालील मुद्दयाच्या आधारे निबंध लिहा :– **( कोणताही एक)** **1X5=5**

**शेतकऱ्याचे मनोगत**

**मुद्दे:–** मी एक गरीब शेतकरी––– शेती हा पारंपरिक व्यवसाय ––अहोरात्र कष्ट––– बिकट अवस्था ––पाऊस न पडणे ––अतिवृष्टीची टांगती तलवार –– कृषीप्रधान देश –– शासनाची तुटपुंजी मदत––संरक्षण नाही ––– बाजारात अडचणी –– उत्पादनास योग्य भाव मिळत नाही ––– कर्जबाजारी ––– आत्महत्येची घटना –––शेतकरी सुखी तर देश सुखी .

**स्वप्ने नसती तर ........**

**मुद्दे :–** जगात प्रत्येकाला दुःख ––– आशावाद ––– दिवस पालटतील ––– स्वप्न पहाणे–––त्यासाठी प्रयत्न––– आजचे दुःख सहन करण्याची ताकद––– त्यातून आनंद–– ध्येयसिद्धी –––अन्यथा दुःख,निराशा,नीरसता.

**::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::**